हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'चा महिला संघ व्हॉलीबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक

## इंटरझोनल स्पर्धेसाठी संघाची निवड;खेळाडूंना मान्यवरांचे मार्गदर्शन



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व जनता शिक्षण मंडळ देवचंद कॉलेज, अर्जुननगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व्हॉलीबॉल स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हा-पूरच्या महिला संघाने तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश मिळवले आहे. या यशामुळे संघाची वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे होणाऱ्या इंटरझोनल स्पर्धेसाठी निवड झाली असून संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.खेळाडूंना मान्यवरांचे प्रोत्साहन मिळाले;

कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ.कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. डॉ.आर.आर.कुंभार, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ.श्रुती जोशी, डॉ.विकास जाधव, प्रा.संतोष कुंडले, प्रा.समीर पठाण, प्रा.प्रशांत कांबळे, प्रा.साद मुजावर, रजिस्ट्रार एस.के.धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन खेळाडूंना लाभले.

महाविद्यालयीन महिला व्हॉलीबॉल संघाच्या या यशामुळे विद्यार्थिनींमध्ये उत्साहाचे वातावरण असून इंटरझोनल स्पर्धेतही संघ तितक्याच जोमाने कामगिरी करेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.